| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | १५.०२.२०२२ |
| नोंदणी तारीख | १५.०२.२०२२ |
| निकाल तारीख | २१.०७.२०२६ |
| कालावधी | **०४ वर्षे ०५ महिने ०६ दिवस** |

**भाग अ***
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.–२४/ब** |
| **सिरोंचा येथील प्रथमवर्ग न्यादंडाधिकारी, सिरोंचा, यांच्या न्यायालयात,** पिठासिन अधिकारी : उन्मेश बा. श्रीराम | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.**१४२/२०२१**, **सिरोंचा** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **२१.०७.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक १७/२०२२**<br>**CNR- MHGA08-000111-2022** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, सिरोंचा पोलीस ठाणे<br>(फिर्यादी- रवि मलय्या पतंगी) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. के. व्ही. तोकलवार,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **मल्लरेड्डी लच्चना पेद्दाबोईना,**<br>वय- २४ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>राहणार- आरडा,<br>तह. सिरोंचा, जिल्हा - गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए. एस. पोट्टाला.**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

## भाग ब*

## [फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ११.०८.२०२१ |
| पहिल्या खबरीची तारीख | ११.०८.२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १३.०२.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २१.०२.२०२६ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २५.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २१.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २१.०७.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

### आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मल्लरेड्डी लच्चन्ना पेद्दाबोईना | १२.०८.२०२१ | १४ ऑगस्ट २०२१ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ४५४, ३८० नुसार | **निर्दोष** | – | – |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(३)]**
**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रवि मलय्या पतंगी **(निशाणी क्र.१९)** | फिर्यादी |
| सा.क्र.२ | राजबापु कोमली पसुला **(निशाणी क्र.२२)** | साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी-२०/**सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी **पी-२१/**सा.क्र.१ | छापील एफ.आय.आर. |

**ड. महत्वाच्या वस्तुः**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | -- | -- |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

# न्यायनिर्णय

[आज दिनांक **२१ जुलै, २०२६** रोजी उद्घोषित]

प्रस्तुत प्रकरणात आरोपीवर त्याने फिर्यादीच्या घरी कोणी नसतांना फिर्यादीच्या घरातुन स्टीलच्या डब्यात ठेवलेले ९०००/- रूपये चोरून नेल्याचा आरोप आहे. आरोपीने सदर आरोप नाकारला व दोषसिध्दतेचे आव्हान अभियोग पक्षाला मिळाले. प्रस्तुत प्रकरण निकाली निघणेकामी तब्बल चार वर्षाहून अधिक कालावधी लागला.

**पोलीस अहवालातील समोर येणारे तथ्यः-**

2. दिनांक ११.०८.२०२१ रोजी दुपारी १२.०० ते ०१.०० च्या दरम्यान फिर्यादी व त्याचे कुटुंबिय हे मजुरीसाठी शेतात गेले होते. त्यावेळी राजबापु कोमली पसला याने फिर्यादीस सांगितले की, त्यास आरोपीने कॉल करून सांगितले की, "मी रवि पतंगी यांच्या घरातील ९०००/- रूपये चोरले आहे, तु देखील त्यांच्या घरी ये आपण मिळुन आलमारीची चोरी करू". राजबापु याने त्यास नकार दिला. सदर माहितीवरून फिर्यादी त्याच्या आईसह घरी गेला असता त्यास घराचा दरवाजा मोकळा दिसला व स्वयंपाक खोलीतील स्टीलच्या डब्यातील ९०००/- रूपये चोरी गेल्याचे दिसले. फिर्यादीने आरोपीस सदर पैसे परत मागितले असता आरोपीने त्यास नकार दिला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द सिरोंचा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. फिर्यादीच्या तक्रारीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक १४२/२०२१, सिरोंचा पोलीस ठाणे येथे भारतीय दंड संहितेच्या कलम ४५४ व ३८० अन्वये दाखल करण्यात आला.

3. संबंधित गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक, शितल बी. धविले यांच्याकडे सोपवण्यात आला. श्रीमती. धविले यांनी तपासाअंती आपला अंतिम अहवाल फौजदारी संहितेच्या कलम १७३ प्रमाणे न्यायालयात दाखल केला. त्यासोबत त्यांनी मुळ खबर, घटनास्थळ पंचनामा, कागदपत्रे आणि साक्षीदारांचे

जाबजबाब हे दस्त तयार केले. त्यांच्या तपासातील निष्कर्षानुसार आरोपीने फिर्यादीच्या घरातुन ९०००/- रूपये चोरले बाबतचा पुरेसा पुरावा मिळाल्याचे अंतिम अहवालात नमुद असुन त्यानुसार सदर खटला नोंदविण्यात आला.

**गुन्ह्याची दखल, आरोपीचे प्रतिकथन व बचावः-**

4. आरोपीकडून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३९ प्रमाणे दोषमुक्त करण्याचा अर्ज सादर करण्यात आला नाही अगर तशी परिस्थिती या प्रकरणात नव्हती. त्यानंतर, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४० नुसार दिनांक २१.०२.२०२६ रोजी या न्यायालयाने आरोपी विरोधात दोषारोप निश्चित केला. तो दोषारोप नि.क्र.१६ खाली दाखल आहे. दोषारोपात नमुद गुन्ह्याचा मजकुर आरोपीस वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने गुन्हा कबुल न करता संपरिक्षेला सामोरे जाण्याचा मार्ग निवडला, हे अभिलेखी असलेल्या त्यांच्या नि.क्र.१७ नुसारच्या प्रतिकथनावरुन दिसून येते. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. तो पुरावा या न्यायनिर्णयाच्या परिशिष्टात नमुद केला आहे. त्यानंतर दिनांक २१.०७.२०२६ रोजी या न्यायालयाने नि.क्र.१ खाली आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

5. अभियोग पक्षाचा पुरावा बंद झाल्यानंतर, आरोपीचे स्पष्टीकरणात्मक निवदेन (निशाणी क्र.२३) फौजदारी संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये नोंदविण्यात आले. त्यात आरोपीने पुर्णपणे निर्दोष असल्याचा बचाव घेतला. हे नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(५) नुसार अतिरीक्त लेखी बयाण सादर केले नाही.

**युक्तीवादः-**

6. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. कृष्णा वि. तोकलवार यांनी यापूर्वी आरोपीची बाजु मांडली असल्याने त्यांनी प्रकरणात

अभियोग पक्षातर्फे युक्तीवाद केला नाही. याउलट आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. पोट्टाला यांनी कथन केले की, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने उलटतपासात स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्याने संशयावरून व रागापोटी आरोपीविरूध्द तक्रार दिली होती. आरोपी व फिर्यादीचा न्यायालया बाहेर समझोता झाला असल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करावे, अशी त्यांनी विनंती केली.

**विचाराधीन प्रश्नः–**

7. या संपूर्ण पार्श्वभूमीवर, अभियोग पक्षाने आरोपीविरोधातील गुन्हा सिध्द करणारा पुरावा सादर केला आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी या न्यायालयाने यापुढे नमूद प्रश्नांबाबत निर्णय नोंदविणे गरजेचे होते. न्यायालयासमोरील प्रकरण, त्यातील तथ्ये व परिस्थिती पाहता आणि उपलब्ध पुराव्याचे सुयोग्य परिनिरीक्षण केल्यावर आज न्यायालयाने सदर प्रश्नांना निर्णय नोंदविले आहेत. ते त्या त्या प्रश्नासमोर मांडले आहेत. या निर्णयांमागची कारणमीमांसा न्यायनिर्णयाच्या उत्तरार्धात शब्दबध्द केली आहे. ते विचाराधीन प्रश्न त्याबाबतचे निर्णय आणि कारणमीमांसा येणेप्रमाणे–

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निर्णय |
|---|---|---|
| १ | दि.११.०८.२०२१ रोजीचे १२.०० ते १३.०० वाजेच्या दरम्यान मौजा आरडा, तह. सिरोंचा, जि. गडचिरोली येथे, आरोपीने फिर्यादीच्या घरी कुणी नसतांना चोरीच्या हेतुने कुलुप खोलुन बेकायदेशीर रित्या घरात प्रवेश करून स्वयंपाक खोलीतील डब्यात ठेवलेले ९०००/– रूपये चोरून नेले आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाच्या **कलम ४५४** प्रमाणे दंडनिय अपराध केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ...नाही... |
| २ | वर नमुद तारीख, वेळ आणि ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या घरी कुणी नसतांना चोरीच्या हेतुने कुलुप खोलुन बेकायदेशीर रित्या घरात प्रवेश करून स्वयंपाक खोलीतील | ...नाही... |

| | | |
|---|---|---|
| | डब्यात ठेवलेले ९०००/- रूपये चोरून नेले आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाच्या **कलम ३८०** प्रमाणे दंडनिय अपराध केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | |
| ३ | काय आदेश पारीत करता येईल? | अंतिम आदेशाप्रमााणे. |

## कारणमीमांसा

### विचाराधीन प्रश्न क्रमांक १ व २ च्या अनुषंगाने :-

8. वर नमुद विचाराधीन प्रश्न क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्याबाबतची कारणमीमांसा आणि चर्चा एकत्र करण्यात येत आहे.

9. दोषारोपात आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला या खटल्यातील अभिकथित तथ्यांनुसार हे सिध्द करणे आवश्यक होते की,

अ. आरोपीने दबा धरून फिर्यादीच्या घरात घुसखोरी केली

ब. आरोपीने सदर घुसखोरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने केली होती.

क. आरोपीने फिर्यादीच्या घरातील ९०००/- रूपये चोरून नेले.

10. नेहमी तपासाअंती असा निष्कर्ष मांडला जातो की, अहवालात नमूद गुन्हे संबंधित आरोपीने केले असावेत असा पुरावा मिळाला आहे. परंतु, संपरिक्षेअंती, उपलब्ध पुराव्यावरुन विचारात घेतलेले गुन्हे आरोपीने केलेच आहेत हे सिध्द होत आहे ही मजल अभियोग पक्षाला गाठावी लागते. म्हणजेच **'आरोपीने गुन्हे केले असावेत'** पासुन **'आरोपीने गुन्हे केल्याचे सिध्द होते'** इथपर्यंतचा प्रवास अभियोग पक्षाला आपल्या सादर केलेल्या पुराव्याआधारे करावा लागतो. अर्थातच, पुरावा कायद्याच्या कलम ०३ प्रमाणे असलेल्या 'शाबीती' च्या व्याख्येनुसार एखादे तथ्य अस्तित्वात आहे असा न्यायालयाचा समज होतो किंवा सर्वसामान्य बुध्दिमत्ता असलेल्या मानवाने ते तथ्य अस्तित्वात आहे अशा समजुतीने विशिष्ट परिस्थीतीत

वागायला हवे इतके त्या तथ्याचे अस्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते, तेव्हा ते तथ्य शाबित झाले असे म्हणता येते. म्हणजेच अभियोग पक्षाचा आरोप ज्या तथ्यांवर अवलंबून आहे ते तथ्य व त्याचे अस्तित्व अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे असते.

11. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाची ही आद्य जबाबदारी असते की, त्यांनी हे गुन्हादर्शक तथ्य प्रस्थापित करणारा पुरावा सादर करावा. ही जबाबदारी पार पाडतांना, सादर केलेल्या पुराव्यातुन अगर पुराव्याभोवती कोणताही वाजवी संशय निर्माण होउ नये, ही काळजी अभियोग पक्षाला घ्यावी लागते. कारण असा वाजवी संशय निर्माण झाल्यास त्यामुळे तथ्य सिध्दतेचा अपेक्षित स्तर साधला जात नाही आणि त्यामुळे अभियोग पक्ष अयशस्वी ठरल्याचा निष्कर्ष मांडणे न्यायोचित ठरते. म्हणुनच, अभियोग पक्षाला आपल्या पुराव्याच्या सादरीकरणादरम्यान सजगता आणि दक्षता बाळगावी लागते. कोण साक्षीदार काय कथन करीत आहे, कोणत्या दस्तातुन कोणते तथ्य प्रस्थापित होत आहे आणि कोणता वाजवी संशय निर्माण होत आहे कां, याकडे अभियोग पक्षाला अत्यंत बारकाईने लक्ष द्यावे लागते.

12. अभियोग पक्षाने केलेले आरोपी सिध्द करण्याची संपुर्ण जबाबदारी त्यांची असते. सदर आरोपी सिध्द करताना अभियोग पक्षाने प्रकरणातील गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातून सिध्द करणे गरजेचे असते. अशा पुराव्याची सांगड घालताना त्यातून कोणताही संशय निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी देखील अभियोग पक्षाची असते. प्रकरणात जर निर्माण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला उपयोगी ठरतो. त्यामुळे उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे अत्यावश्यक आहे.

13. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ दोन साक्षीदार तपासले. विस्तृत चर्चा करण्यापूर्वी येथे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने सरतपासात आरोपीविरूध्द कथन केले, परंतु उलटतपासात फिर्यादीने

आरोपीविरूध्द कुठलेही कथन केले नाही व त्यांच्या समझोता झाल्याचे मान्य केले. तसेच साक्षीदार क्र. २ नामे राजबापु पसुला याने देखील अभियोग पक्षास सहकार्य करणारे कथन केले नाही.

14. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी नामे रवि मलया पतंगी यास नि.क्र. १९ खाली साक्षीदार क्र. १ म्हणून तपासण्यात आले. त्याने त्याच्या सरतपासात घ डलेली घटना विस्तृत कथन केली. त्याच्या म्हणणे प्रमाणे दिनांक ११.०८.२०२१ रोजी त्याच्या घरी कुणीही नव्हते. सदर दिवशी त्यास राजबापु पसुला याचेकडुन माहिती मिळाली की, आरोपीने त्याच्या घरातील ९०००/- रूपये चोरून नेले आहे. फिर्यादीने घरी येवुन तपासले असता, त्यास पैसे चोरी गेल्याचे समजले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस पैसे परत मागितले असता, त्याने नकार दिला. सबब, फिर्यादीने आरोपीविरूध्द तक्रार दाखल केली. फिर्यादीने नि.क्र.२० व २१ खालील फिर्यादीतील मजकुर मान्य करुन ती सिध्द केली.

15. बचाव पक्षामार्फत घेण्यात आलेल्या फिर्यादीच्या उलट तपासात त्याने सरतपासातील कथनांवर घुमजाव करून, स्पष्टपणे मान्य केले की, त्याने आरोपीस चोरी करतांना पाहिले नव्हते. त्याने आरोपीविरूध्द केवळ संशयावरून, ऐकिव माहितीवरून व रागापोटी तक्रार दिली होती. फिर्यादीने हे देखील मान्य केले की, त्याची आरोपीविरूध्द कुठलीही तक्रार शिल्लक नसल्याने, त्यास आरोपीविरूध्द प्रकरण पुढे चालवायचे नाही.

16. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच घडलेली घटना मान्य करीत नसल्याने व उलटतपासात आरोपीविरूध्द कुठलीही तक्रार नसल्याचे मान्य करीत असल्याने आरोपीविरूध्द कुठलाही गुन्हा सिध्द होत नाही. तरी देखील अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. २ म्हणून राजबापु कोमली पसुला यास नि.क्र. २२ खाली तपासले. सदर साक्षीदारास आरोपीने फोन करून पैसे चोरले असल्याचे सांगितले असे कथन अभियोग पक्षाचे होते, परंतु प्रस्तुत साक्षीदाराने देखील त्याच्या सरतपासात व उलटतपासात त्यास घटनेविषयी काहीही माहित नसल्याचे कथन केले. प्रस्तुत

प्रकरणातील दोन्ही मुख्य साक्षीदार घटना मान्य करीत नसल्याने आरोपीविरूध्दचा गुन्हा शाबित होत नाही. परिणामी प्रस्तुत प्रकरणात भारतीय दंड संहितेच्या कलम ४५४ व ३८० ची आवश्यक तत्वे देखील सिध्द होत नाही.

17. प्रस्तुत प्रकरणात भारतीय दंड संहितेच्या ४५४ व ३८० ची आवश्यक तत्वे पुर्ण झालेली दिसत नाही. प्रकरणातील मुख्य साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य करीत नाही, तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यात न्यायालयाबाहेर झालेला समझोता लक्षात घेता, आरोपीला प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष मुक्त करणे संयुक्तिक होईल. सबब, वरील सर्व चर्चेअंती मी विचाराधीन प्रश्न क्रमांक १ व २ चे नकारार्थी उत्तर नमुद करतो व विचाराधीन प्रश्न क्र.३ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

:::: **आ दे श** ::::

1. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८(१) नुसार आरोपी मल्लरेड्डी लच्चन्ना पेद्दाबोईना यांना भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ४५४ व ३८० नुसार दंडनिय गुन्हे केल्याचे सिध्द न झाल्याने त्यास या गुन्ह्यातुन **निर्दोष** मुक्त करण्यात येत आहे.

2. आरोपीचे अस्तित्वांत असलेले सर्व मुचलके, बंधपत्रे आणि जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत. मात्र, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७ (अ) नुसार आरोपीने नव्याने रुपये २५,०००/- चा वैयक्तिक मुचलका करुन देउन मा. अपिलीय न्यायालयासमोरील त्याची हजेरी सुनिश्चित करावी. हा मुचलका पुढील सहा महिन्यांसाठी वैध राहील.

3. प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रूपये ९०००/- रूपये आरोपीने त्याचे असल्याचा दावा केला नसल्याने ते फिर्यादीस अपील कालावधी नंतर सुप्रर्तनाम्यावर परत देण्यात यावी.

4. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता** या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना

अनुसरुन, या न्यायनिर्णयाची एक सत्यप्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

*सदरील स्वहस्ते मुद्रित केलेला न्यायनिर्णय आज दि.२१.०७.२०२६ रोजी, आरोपीच्या उपस्थितीत ०६.०० वाजता उद्घोषित केला.*

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.07.21 19:12:13 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा
(न्यायिक अधिकारी संकेतांक क्रमांक–MH03286).